E- ISSN 2582-5429
AMRJ
*Akshara Multidisciplinary Research Journal*
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
January-March 2023 Volume 04 Issue I SJIF Impact- 5.67

38

# स्वातंत्र्यपूर्व काळातील मराठी सामाजिक कांदबरी समिक्षा

## (यमुना पर्यटन,पण लक्षात कोण घेतो?,ब्राम्हणकन्या,विधवाकुमारी या कादंबऱ्यांच्या संदर्भात)

डॉ.कैलास बुधा वाघ
श्रीमती विमलबाई उ.पाटील कला व कै.डॉ.भास्कर सदाशिव देसले विज्ञान
महाविद्यालय साक्री, ता. साक्री, जि.धुळे

---

मराठी साहित्यामध्ये कादंबरी हा वाङ्मय प्रकार महत्वाचा प्रकार मानला जातो. मराठी कादंबरीचा उगम साधारणपणे एकोणिसाव्या शतकात झालेला दिसून येतो. मराठी भाषेतील पहिली स्वतंत्र कादंबरीचा मान हा बाबा पद्रजी यांच्या 'यमुना पर्यटन' (१८५७) या कादंबरीकडे जातो. यानंतर मराठी साहित्यात अनेक कादंबऱ्या निर्माण झाल्या त्यामध्ये लक्ष्मणशास्त्री हळबे यांची 'मुक्तामाला' ह.ना. आपटे यांची पण लक्षात कोण घेतो? ना.स. रिसबुड यांची 'मंजूघोषा' वां.म. जोशी यांचा सुशिलेचा' देव श्री.व्य.केतकर यांची ब्राम्हणकन्या, मामा वरेरकर यांची ' विधवाकुमारी या व इतर लेखकांच्या कादंबऱ्या उदयास आल्या.

वरील कादंबऱ्याच्या अभ्यासातून एक लक्षात येते की, या कादंब कादंबऱ्याचा काळ हा स्वातंत्र पूर्व आहे. या काळात महाराष्ट्रातच नव्हे तर संपूर्ण भारतात स्त्रीयांचे प्रश्न फार महत्वाचे होते यात बालविवाह प्रथा,जरठकुमारी विवाह प्रथा,विधवापण, केशवपन, स्त्रीदास्य व इतर याविषयीचे प्रश्न समाजासमोर 'आ' वासून उभे होते परंतु याकडे दुर्लक्ष केले जात होते, परंतु बाबा पद्मनजी व तत्कालीन लेखकांनी या सर्व सामाजिक प्रश्नांची मांडणी मानवतावादी दृष्टीकोनातून आपल्या कादंबऱ्यामधून केली याचे समीक्षण खालील काही कादंबऱ्यातून करता येईल.

इंग्रजी कालखंडामध्ये शिक्षित पिढीने तत्कालीन परिस्थितीचा अभ्यास करुन तर्कशुध्द पध्दतीने जुन्या जाचक रूढी परंपरांना विरोध करून स्त्रीविषयक प्रश्नांची मांडणी मानवतावादी दृष्टिकोणातून कादंबऱ्यातून मांडली यात प्रामुख्याने बाबा पदमनजी यांची 'यमुना पर्यटन' या कादंबरीच्या कथनातून मांडलेली आहे. या कादंबरीत यमुना लग्नानंतर आपल्या पतीसोबत भौगोलिक पर्यटनाला जाते. त्यावेळेला तिला विविध स्त्रिया भेटतात यात काही विवाहित तर काही विधवा असतात. त्या स्त्रियांची कहाणी ऐकून यमुनेला हिंदु धर्म व त्यातील जाचक रूढी परंपरा खूपच वाईट वाटते. कादंबरीत शेवटी यमुनेच्या नवऱ्याचा मृत्यू होतो. तिचा नवरा मेल्यानंतर तिला हिंदू धर्मानुसार पुनर्विवाह करण्यास रितीरिवाजाप्रमाणे बंदी असल्यामुळे तिला केशवपन करून मरेपर्यंत विधवेचं निवन जगाव लागणार म्हणून याला विरोध करत यमुना ख्रिचन धर्म स्विकारते आणि ख्रिचन धर्मानुसार पुनर्विवाह करते आणि आपल्या नवीन जीवनाला सुरुवात करते.

'यमुना पर्यटन' या कादंबरीत सामाजिक प्रश्नाची मांडणी केलेली दिसून येते.विधवांच्या प्रश्नाबरोबरच धर्मांतराचाही प्रश्न इथे येताना दिसतो या विषयी भालचंद्र फडके मांडतात कि,या कादंबरीत यमुनेच्या व्दिविध पर्यटनाची कथा आहे.एक तिने आपल्या नवऱ्या बरोबर केलेले पर्यटन आणि दुसरे तिचे वैचारिक पर्यटन"१ याचा अर्थ असा कि सदर कादंबरी हि सामाजिक प्रश्नाची मांडणी वैचारिक पद्धतीने करतांना दिसून येते.तसेच या कादंबरीच्या कथानकातून पद्मनजी यांनी हिंदु धर्माच्या जाचक रूढी परंपराचा त्याग करुन समतावादी विचारांचा, स्त्री स्वातंत्र्याचा पुरस्कार करुन मानवतावादी दृष्टिकोन नमूद केलेला दिसुन येतो.

त्याच प्रमाणे हरिभाऊ आपटे यांच्या कादंबऱ्यातून सुद्धा सामाजिक प्रश्नाची मांडणी केलेली दिसून येते.त्यांचा स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टिकोन मानवतावादी होता. हे प्रकट होते. यात प्रामुख्याने आपटे यांच्या 'पण लक्षात कोण घेतो? या कादबरीतून बालविवाह प्रथेला नकार देऊन स्त्रीस्वातंत्र्यः व स्त्रिशिक्षणाचा पुरस्कार केलेला दिसून येतो या कादबरीतील यमु आणि दुर्गा या दोन मैत्रिणी वाचकाचे लक्ष वेधून घेतात. दुर्गाच्या लग्नानंतर तो रुढीप्रिय संसारी जीवन जगत असतांना तिचे हाल होतात. यमूचे आजी-आजोबा रुढीवादी असतात तरीही यमुचा बाप सुधाणावादी विचारांचा असल्याने तो यमुचे लग्न रघुनाथ नावाच्या तरुणाशी लावतात तिच्या सासऱ्याच्या निधनानंतर ती नवऱ्यासह तिचा मामेसासरा शंकरमामंजी यांच्याकडे राहतात. परंतु हा रुढीवादी विचारांचा असतो. रघुनाथ सुशिक्षित व सुधारणावादी विचारांचा असल्यामुळे तो यमुना शिक्षणाचा आग्रह करतो. रघुनाथच्या मित्रांच्या पत्नीशी यमुची मैत्री होते. त्या सुशिक्षित निर्भिड व रुढी परंपरेची बंधने झुगारुन बाळगणाऱ्या असतात. त्यांच्या मैत्रीमुळे यमु हुशार होते. त्यांच्या बरोबर सामाजिक सभांना, कार्यक्रमांना जाते, वादविवादात सहभागी होते. स्वतंत्रपणे विचार मांडते, काही काळानंतर यमुच्या नवऱ्याचा मृत्यु होतो तेव्हा तिचा मामेसासरा तिला केशवपनाचा आग्रह करतात पण ती



Sakri (Dhule)
PRINCIPAL
K.S.S's.Smt.V.U.Patil Arts & Late Dr.B.S.Desale Science College
PRINCIPAL
Arts &
College
17

E- ISSN 2582-5429

Akshara Multidisciplinary Research Journal

Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal

January-March 2023 Volume 04 Issue I SJIF Impact- 5.67

त्याला विरोध करते. कालांतराने यमु आजारी पडते तिच्या आजारपणाचा फायदा घेत शंकर कटकारस्थान रचुन तिचे केस कापतात. त्या आघाताचा धसका घेऊन यमुना मरण पावते.

हरिभाऊच्या सामाजिक कादंबऱ्यांचे विशेष अभ्यासाअंती डॉ.श्रीलेखा साने मांडतात की,हरिभाऊंनी सामाजिक जाणीवेच्या प्रेरणेतून सामाजिक कादंबऱ्याचे लेखन केले.त्यांच्या कादंबरीतील जीवन हे तत्कालीन समाजजीवनाचे प्रतिबिंब आहे.सामाजिक वास्तवाचे परिणामकारक चित्रण त्यात आढळते."२ यातून असे दिसून येते कि हरिभाऊंच्या सामाजिक कादंबऱ्यातून समाज जीवनाचे वास्तव चित्रण पहावयास मिळते.त्याचप्रमाणे हरिभाऊंच्या इतर सामाजिक कादंबऱ्या वाचकाचे मन वेधून घेतात.त्यांच्या कादंबऱ्यातील पात्रांशी ते एवढे समरस होतात की ती पात्रे वाचकाला जीवंत वाटू लागतात. या पात्रांच्या सुख दु:खाशी वाचकही समरस होवून जातात.या विषयी अ.ना.देशपांडे मांडतात की, "हरिभाऊंच्या वृतीत जे एक विलक्षण मार्दव आहे,त्यातील मृदुता त्यांच्या शब्दातही साठविली असून ते शब्द आपल्या हृदयास विरघळून सोडतात."३ या वरून हरिभाऊंच्या सामाजिक कादंबऱ्यांचे विशेष कळून येते.

एकुणच हरिभाऊंच्या सामाजिक कादंबऱ्यांचा अभ्यास करता जाणवते की, हरिभाऊंनी हिंदू धर्मातील तत्कालिन काळातील स्त्रियांवरील अन्यायकारक रुढी, चालिरीती, परंपरा मोडीत काढून स्त्री शिक्षणाचा प्रसार करुन स्त्रियांनी सामाजिक उन्नतीकडे मानवतावादी दृष्टिकोनातून वाटचाल करावी तसेच सासु, नवरा, मैत्रीण यांच्याद्वारे समता, स्वातंत्र आणि सुधारणावादी दृष्टिकोनातून विचार मांडलेले आहेत.

'ब्राम्हणकन्या' या कादंबरीतून श्रीधर व्यंकटेश केतकर यांनी जातिधर्माच्या रुढी झुगारुन आंतरजातीय व आंतरधर्मीय विवाहाचा पुरस्कार केलेला दिसून येतो. या कादंबरीच्या कथानकातून नवशिक्षित मंजुळा कनिष्ठ जातीची असते. ती शिक्षितमुळे स्वजातीय तरुणाशी विवाह करण्याचे नाकारून तिच्या सुंदर रुपामुळे पांढरपेशीय वर्गातील पुरुषांशी ती सलगी करते. यात चिंतोपंतांशी तिचे प्रेम जुळते. ते मंजूळेला पत्नीचा दर्जा देतात. त्यांना विवाहबाहय संबंधातून शांता नावाची मुलगी होते. कालांतराने अनौरसमुळे शांताच्या लग्नाचा प्रश्न उद्धवतो तेंव्हा आप्पासाहेब नावाचा वकील जातीपातीचा विचार न करता शांताशी लग्न करतो त्यांना सत्यव्रत, कालिंदी व उषा ही मुले होतात.

कालांतराने कालिंदी महाविद्यालयीन शिक्षण घेते तेव्हा एका शिवचरण नावाच्या विवाहित पुरुषाच्या ती प्रेमात पडते व त्याची रखेल म्हणून रहाते. या तिच्या स्त्री स्वातंत्र्याचे वागण्याचे सत्यव्रत व तिच्या वडीलांना मान्य नसते कालातराने कालिंदी व शिवचरणमध्ये वाद होतात. तिला स्वता:ची चुक कळते शिवचरणपासून तिला एक मुल होते. स्वयंभू होण्यासाठी ती नवऱ्याचा त्याग करुन ज्यु लोकांच्या वस्तीत राहते व नाव बदलुन मासिकात लेखन करते. सामाजिक विषयांवर चर्चा करते. यात एसतरशी तिची मैत्री होते. याच दरम्यान रामराव नावाच्या सामाजिक कार्य करणाऱ्या गृहस्थाशी तिची मैत्री होते. कालांतराने तिच्या वडिलांचे निधन होते. सत्यव्रत' जातिविहीन धैर्यवान मंडळी संघ स्थापन करतो दुसरीकडे उषाचे बेंजामिन या इस्राईल युवकाशी मैत्री होती. यातुनच शेवटी कालिंदी रामराव,सत्यव्रत-एसतेर व उषा-बेंजामिन विवाहबध्द होतात.

एकूणच या कादंबरीतून केतकर यांनी रुढी, परंपरा, जात, धर्म या गोष्टीतून बाहेर येवुन आंतरधर्मीय, आंतरजातीय विवाहाचा पुरस्कार केलेला दिसून येतो. तसेच मानवता हाच खरा धर्म आहे. हे चित्रित करण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो.

त्याचप्रमाणे मामा वरेरकर यांच्या ' विधवाकुमारी' या कादंबरीतून मधु नावाच्या मुलीचे लग्न बालवयातच एकी म्हाताऱ्याशी लावले जाते. कालांतराने म्हाताऱ्याचा मृत्यु होतो. मृत्युनंतर सावत्र मुलगी आणि जावाई जे तिच्यापेक्षा वयस्कर असतात परंतू प्रेमळ असतात ते मधुला सांभाळून शिक्षणासाठी प्रोत्साहन देतात. उच्च शिक्षणासाठी ती परदेशात जाते. उच्च शिक्षण घेतल्यानंतर सुध्दा तो पुनर्विवाहाचा विचार करत नाही ते तीला आवडत नाही. कारण तिने बालवयातच संसाराचा धसका घेतलेला असतो. तरीही ती उच्च शिक्षण घेते. एकंदरीत तिच्या सावत्र मुलगी आणि जावाई यांच्या सुधारणावादी विचारांमुळे तिच्या मनावरही सुधारणावादी व मानवतावादी विचारांचा प्रभाव होताना दिसुन येतो.

'सुशिलेचा देव' या वा. म. जोशी यांच्या कांदबरीतून सुशीलाचे रावबा सोबत लग्न होते. रावबा नास्तिक असतो.सासु प्रेमळ असल्याने ती सुशीलाचे शिक्षण सुरु ठेवते. सुशिला आपल्या सुनंद व बाळू या मित्र-मैत्रिणी विरुद्ध चर्चा, वाद-विवाद करते, कालांतराने ती शाळेत नोकरी करते स्त्रियांची प्रगतीविषयी जाती-प्रथा,रुढी-परंपरा, बालविवाहाला विरोध विधवा पुनर्विवाहाला प्रोत्साहान देते. नवऱ्याच्या निधनानंतर बाळू सोबत ती लग्न करुन समाजकार्य करते.

एकूणच या कादंबरीतून लेखकांनी स्त्रियांचे प्रश्न, सामाजिक प्रश्न तसेच स्त्री स्वातंत्र, पुनर्विवाह, अनिष्ठ रुढी,परंपरा चालिरीती या विषयी विचार मांडून समाजाने या सर्व प्रश्नांकडे मानवतावादी दृष्टिकोनातून बघितले पाहिजे हे दर्शविलेले आहे.



Sakri (Dhule)
PRINCIPAL
S.S.'s Smt.V.J.Patil Arts & Late Dr.B.S.Desale Science College

E- ISSN 2582-5429
AMRJ
*Akshara Multidisciplinary Research Journal*
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
January-March 2023 Volume 04 Issue I SJIF Impact- 5.67

साधारणपणे सामाजिक कादंबऱ्याच्या संदर्भात आपली भूमिका मांडताना प्र.वा.बापट व ना.वा.गोडबोले असे मांडतात की,सभोवतालच्या समाजाचे सूक्ष्म अवलोकन करून त्यातील वर्तमान व भावी अन्त: प्रवाहांची दिशा व्यक्त करून त्यातील समाजाचे चित्र रंगविणे हे सामाजिक कादंबरिकाराचे साध्य असते."४ याचा अर्थ ज्या समाजजीवनाचे कादंबरीकार देत असतो.त्या जीवनाचे चित्रण करतांना त्यावर स्वत:चा व्यक्तित्वाचा ठसा उमटतांना दिसून येतो.

साधारणपणे वरीलप्रमाणे सामाजिक कादंबऱ्याचा अभ्यास करतांना निष्कर्ष निघतो की स्वातंत्र्यपूर्व कालखंडात स्त्रियांना असमानतेची वागणूक दिली जात होती. त्यांच्यावर अन्याय केला जात होता. त्यांच्यावर रुढी-परंपरा,चालिरितींची ओझी होती. त्यांच्या प्रश्नांची कोणीही पर्वा करीत नव्हते परंतु या व इतर सामाजिक कादंबऱ्यांनी या स्त्री अन्यायकारक गोष्टींना मुठमाती दिली. तसेच परंपरागत चालत आलेल्या प्रथांना विरोध करून समतावादी, सुधारणावादी आणि मानवतावादाचा एक नवा दृष्टिकोन समाजासमोर मांडलेला आहे.

संदर्भ सूची-

१) प्रदक्षिणा-खंड पहिला - प्रकाशक, अनिरुद्ध कुलकर्णी पृ.क्र.२०३
२) मराठी वाङ्मयाचा अभिनव इतिहास – संपा. डॉ.गं.ना.जोगळेकर पृ.क्र.४७ (काही लेखक,काही साहित्यकृती इ.स.१८००-१९२० )
३) आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास(भाग-१) - अ.ना.देशपांडे पृ.क्र.१६०
४) मराठी कादंबरी तंत्र आणि विकास - प्र.वा.बापट,ना.वा.गोडबोले पृ.क्र.११५
५) पण लक्षात कोण घेतो?(कादंबरी) –ह.ना.आपटे

PRINCIPAL
Sakri (Dhule)
PRINCIPAL